**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे**
Pune metropolitan Region Development Authority,Pune
४ था मजला,नवीन प्रशासकीय इमारत ,आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ,पिंपरी-चिंचवड, पुणे ४११०४४ 4th floor ,New Administration Building ,opp Akurdi Railway Station,Pimpri -chinchwad,PunePh No. : 020- 259 33 344 / 356 / 333 /
फोन. नं. ०२०- २५९३३३४४/ ३५६ / ३३३ Email: comm@pmrda.gov.in

---

## तात्पुरते रेखांकनास विकास परवानगी
### (मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ६.६.२ नुसार)

---

जा.क्र.: बीएमए/मौ.सांगवी/ग.नं. ६८ (पै.)/प्र.क्र.२३६०/२३-२४/२१७० दि.२०/०६/२०२४

प्रति,

मा.श्री युवराज काकडे
पत्ता : सांगवी, तालुका – मावळ, जि.पुणे.

मौजे- सांगवी, तालुका – मावळ, जिल्हा- पुणे येथील गट.नं. ६८ (पै.) क्षेत्र २९००.०० चौ.मी. मधील तात्पुरते रेखांकनास परवानगी प्रस्ताव मंजूरीस्तव प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे.

आपण प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रास अधिन राहून तसेच सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद अटी व शर्तीस अधिन राहून उक्त तात्पुरते रेखांकनास विकास परवानगी देण्यात येत आहे.

(मा.महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने)

महानगर आयुक्त,
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.
पुणे यांचेकरिता.

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune
PMRDA

Scanned with OKEN Scanner

मौजे- सांगवी, तालुका – मावळ, जिल्हा- पुणे येथील गट.नं. ६८ (पै.) क्षेत्र २९००.०० चौ.मी. मधील तात्पुरते रेखांकनास विकास परवानगी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि २०/०६/२०२४ रोजीचे पत्र क्र. २३६०/२३-२४ सोबतचे

परिशिष्ट 'अ' २९६०

१) मंजूर नकाशाप्रमाणेच जागेचा विकास करणे बंधनकारक राहील.

२) जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, अकृषिक आकारणी आणि ती वरील भार या बाबत अकृषिक आदेश प्राप्त करून घेणे अर्जदार / विकासक / जमीन मालक यांचेवर बंधनकारक आहे. तथापि, शासनाच्या महसूल व वनविभागाकडील परिपत्रक क्र. एनएपी-२०२३/प्र.क्र.६४/ज-१अ. दि. १३/०३/२०२४ अन्वये जमिनीस / भूखंडास आवश्यक असलेल्या अकृषिक परवानगी संदर्भात दिशानिर्देश देण्यात आलेले असून, त्यातील मुद्दा क्र. ४ नुसार विकास परवानगी प्रदान करण्यापूर्वी बिनशेती आदेश घेणे बंधनकारक नाही. याबाबत, अंतिम मंजुरीपूर्वी अकृषिक आदेश प्राप्त करून घेणे अर्जदार / विकासक / जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहील.

३) प्रस्तावासोबत मो.र.न. २५६७/२०२३, दि. ०९/११/२०२३ ने केलेल्या सर्व वहीवाटीचे मोजणी नकाशातील हद्दीचे तसेच जागेच्या मालकी / वहिवाटीबाबत विकासकाने / जमीन मालकाने याबाबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचे अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे. सदर जमिनीचे वहीवाटीचे / हद्दीचे अनुषंगाने अथवा इमारतीबाबत कोणतेही व्यक्तिगत वाद / न्यायालयीन वाद उद्भवले सत्याची सर्वस्वी जबाबदारी विकासक / जमिनमालक यांची राहील. ज्या जागेची मालकी / वहिवाट, विकासक / जमिन मालक यांची नाही अशा कोणत्याही जमिनीवर सदर परवानगीव्दारे विकास अनुज्ञेय राहणार नाही.

४) प्रस्तुतच्या जमिनीवर आर्थिक संस्थाचा बोजा असल्यास त्यास जमीनमालक / विकासक सर्वस्वी जबाबदार राहतील.

५) नागरीजमीन (कमाल धारणा व विनियम) अधिनियम, १९७६ हा निरसित झाला असल्याने या अधिनियमांतर्गत बाबींकरिता प्रस्तावासोबत आपण रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील दिनांक-१६/०१/२०२४ रोजी नोटरी आम्रपाली उदावंत यांचेसमोर केलेले विहीत नमुन्यातील शपथपत्र व बंधपत्र सादर केले आहे. सदर शपथपत्र व बंधपत्रास अधिन राहून सदर परवानगी देण्यात येत आहे. त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी जमीनमालक / विकासक यांची राहील सदर शपथपत्र व बंधपत्रातील माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास झालेले बांधकाम अनधिकृत समजून कारवाईस पात्र राहील.

६) विषयांकित जमिनीवर कोणतेही विकास कार्य सुरु करण्यापूर्वी रेखांकन जागेवर सिमांकित करुन भूमि अभिलेख खात्याकडून प्रमाणित करुन घेणे बंधनकारक आहे. मंजूर रेखांकनानुसार जागेवरील सिमांकन झाल्यानंतर, भूखंडाचे क्षेत्रफळ, रस्त्याची रुंदी क्षेत्र मंजूर रेखांकनात दर्शविल्यापेक्षा कमी भरता कामा नये. यामध्ये कोणताही बदल झाल्यास रेखांकन पुन्हा मंजूर करुन घेणे बंधनकारक राहील. अशा प्रमाणित रेखांकनाची प्रत प्राधिकरणास सादर करुन त्यास अंतिम मंजूरी घेतल्याशिवाय कोणताही विकास करता येणार नाही. तसेच मंजूर रेखांकनानुसार अंतर्गतरस्ते, त्याचप्रमाणे मंजूर प्रादेशिक योजनेचे रस्ते / रस्तारुंदीने बाधीत क्षेत्र जागा विकसित विकास

वाढीव चटईक्षेत्राच्या बदलात संबंधित नियोजन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करावयाचे झाल्यास अशा अनुषंगिक क्षेत्राची मोजणी जागामालकाने / विकसकाने संबंधित भूमी अभिलेख विभागाकडे रितसर अर्ज करुन घेणे बंधनकारक राहील. तदनंतर अशा क्षेत्राखालील जमिनीचे खरेदीखत संबंधित नियोजन प्राधिकरणाचे नावाने जागामालकाने / विकसकाने स्वखर्चाने करुन देऊन तसा ७/१२ उतारा व त्याप्रमाणे प्रत्यक्ष जागेचा ताबा दिल्यानंतरच अशा क्षेत्राचा वाढीव चटईक्षेत्र मिळणेबाबत आवश्यक त्या बांधकाम नकाशा व अनुषंगिक कागदपत्रासह अर्ज करण्यास अर्जदार पात्र राहतील.

७) अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांनी दि. १६/०१/२०२४ रोजी आम्रपाली उदावंत यांचे समोर केलेल्या नोटरी शपथपत्रास अधिन राहुन ही परवानगी देण्यात येते असुन प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील सर्व नियम आणि भारतीय मानक ब्युरोने विहित केलेल्या सुरक्षा प्रमाणकांचे पालन करणे विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.
(नियम क्र. ७.१)

८) विषयाकिंत जागेचे एकुण क्षेत्र विचारात घेऊन रेखांकन नकाशाची छाननी केलेली असुन रेखांकनातील स्वतंत्र भुखंड मंजुरी खेरीज उक्त जागेची तुकडया तुकडयाने उपविभागणी करुन विक्री येणार नाही.

९) अभिन्यासातील रस्ते, व खुली जागा यांची देखभाल व अभिन्यासामध्ये दर्शविलेले वर्गीकृत / प्रादेशिक योजना रस्ते/ रस्ता रुंदीकरणातील क्षेत्र सर्व जनतेच्या वापरासाठी तसेच शेजारच्या जमीन मालकास वापरण्यास खुले ठेवणे बंधनकारक राहील.

१०) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी विकासकांने /जमीनमालकाने भुखंड/ भूखंड वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

११) प्रस्तावित जागेचे अथवा गट नंबर मधील उर्वरित जागेचे तुकडे पाडुन अथवा गुंठेवारीप्रमाणे अनाधिकृतरित्या भुखंड पाडता येणार नाही. अशाप्रकारे अनाधिकृतरित्या तुकडे पाडल्यास ही परवानगी रदद समजण्यात येईल.

१२) सदर रेखांकन हे (Tentative layout approval) तात्पुरते रेखांकन मंजुरीची शिफारस करण्यात येत आहे. सदर रेखांकनाची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन (final layout approval) अंतीम रेखांकन मंजुरी घेणे बंधनकारक आहे.

१३) अर्जदारामार्फतचे क्षतीपत्र (जमिनीवर न्यायालयीन / इतर वाद नसलेबाबत व जमिन भुसंपादनाने बाधीत नसलेबाबत) क्षतीपत्र तसेच प्रतिज्ञापत्र दि. २३/१०/२०२३ ॲड. श्री. सुनिल खेरुड यांचेमार्फत नोटराईज्ड् हमीपत्रमध्ये नमूद केले प्रमाणे अर्जदार / विकसक यांचेवर बंधनकारक राहतील.

१४) जागेतील / जागेलगतच्या नाल्याच्या/ नदीच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा येईल, असे कोणतेही बांधकाम करता येणार नाही. त्याचप्रमाणे उक्त जमिनीवरील विकास करताना जागेवरील

PMRDA

भूपृष्ठ रचनेमध्ये अनाधिकृत बदल करता येणार नाहीत. सदर अटीचा भंग करुन विकास केल्याने दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी विकासक/ जमिनमालक यांची राहील.

१५) नियोजित विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पिण्याच्या पाण्याची सोय आपण अश्वासित केलेल्या सक्षम प्राधिकरणाने / ग्रामपंचायतीने न केल्यास या प्रकल्पातील वापरापूर्वी / हस्तांतरणापुर्वी पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता विकासक / जमिनमालक यांनी स्वखर्चाने प्रत्यक्ष वापरापुर्वी करणे आवश्यक आहे.

१६) विषयांकित जागेस विद्यमान सांगवी – जांभुळ डांबरी रस्त्यापासून १२.० मी. रुंदीचा रजिस्टर्ड खरेदीने प्रस्तावित उत्तर – दक्षिण रस्ता हा पोहोच रस्ता म्हणून उपलब्ध असून, याबाबत दस्त क्र. ८९४७/२०२३, दि. १८/०७/२०२३ ची छायाप्रत प्रकरणी सादर असून, सदर रस्त्याच्या स्थान निश्चितीकरिता भूमी अभिलेख विभागाकडील मोजणी नकाशा मो.र.नं. २५६५/२०२३, दि. १९/११/२०२३ प्रकरणी सादर आहे. त्यानुसार विषयांकित जागेस उपरोक्त नमूद प्रमाणे पश्चिमेकडील उत्तर-दक्षिण रस्ता हा पोहोच रस्ता म्हणून उपलब्ध आहे. तथापि, उक्त खरेदी दस्तामध्ये लिहून घेणार हे राजधीरा रियालटी प्रा.लि. तर्फे श्री. युवराज बाळासाहेब काकडे व इतर २ असे असून, अर्जदार हे भाग्यश्री युवराज काकडे असे असल्याने त्यानुसार अर्जदार यांनी संबंधित रस्त्याबाबत संमतीपत्र सादर केले असून, सदर संमतीपत्रास अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१७) विकास नियंत्रण नियमावली २०१८ मधील नियम क्र. ६.८ नुसार रेखांकनातील सर्व मुलभुत सुविधा (रस्ते, पाणी, लाईट, स्टॉम वॉटर, इ.) उपलब्ध करून देणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

१८) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शुल्क, प्रीमियम शुल्क,विकास शुल्क, वाढीव विकास शुल्क, कामगार कल्याण उपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

१९) अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे हि चुकीची / दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तुतची परवानगी विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल.

२०) सदर प्रकरणी अर्जदार यांनी दि. ०१/०३/२०२४ रोजी चलन क्र. SCRF/२३६० अन्वये रक्कम रुपये १,०००/-, विकास शुल्क दि. १०/०६/२०२४ रोजी चलन क्र. DEVF/३८३ अन्वये रक्कम रुपये ६४,९६०/-, वाढीव विकास शुल्क दि. १०/०६/२०२४ रोजी चलन क्र. ADEV/५१८ रक्कम रुपये ६४,९६०/- इ. शुल्काचा भरणा केला आहे.

(मा.महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने)

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune
PMRDA

महानगर आयुक्त,
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणे यांचेकरिता.

Scanned with OKEN Scanner

